महाराष्ट्र शासन

क्र. नपप्रसं/भ.नि.नी/प्र.क्र. /२०१७/कक्ष - ६/ ५२५६

नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
शासकीय परिवहन सेवा इमारत,
३ रा मजला, सर पोचखनवाला रोड,
वरळी, मुंबई - ४०००३०

दिनांक : /११/२०१७

30 NOV 2017

प्रति,

जिल्हाधिकारी,
सर्व

**विषय :- संवर्गात समावेशन झाल्यानंतर ज्यांना पदस्थापना दिलेली आहे अशा कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी खातेमधून परतावा / नापरतावा अग्रिम मंजूरी तसेच संवर्गात असतांना सेवानिवृत्त झालेले आहेत अथवा होणार आहेत अशा कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी रकमेची अंतिम प्रदाने मंजूर करण्याबाबतचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करणे बाबत.**

संदर्भ :- जिल्हा प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांचे पत्र क्र. कक्ष-२/नपा-४/ कावि/१८७/२०१७ दि. २३/१०/२०१७ चे पत्र.

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार जिल्हा प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांनी नमूद नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्ग कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी खातेमधून परतावा/नापरतावा अग्रिम मंजूरी बाबतच्या प्रस्तावावर आपले स्तरावरुन उचित आदेश होणेस विनंती केली आहे.

तरी या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येत आहे की, श्रेणी ब, क क-१ व क-२ या संवर्गात समावेशन झाल्यानंतर ज्यांना पदस्थापना दिलेली आहे अशा कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी खातेमधून परतावा/नापरतावा अग्रिम मंजूरी तसेच संवर्गात असतांना सेवानिवृत्त झालेले आहेत अथवा होणार आहेत अशा कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी रकमेची अंतिम प्रदाने प्रस्तावांचा जलद निपटारा होण्याच्या दृष्टीने व सदर कर्मचाऱ्यांना निकडीच्या प्रसंगी वेळेत रक्कम मिळण्याच्या दृष्टीने या संचालनालयाचे पुढील आदेश होईपर्यंत भविष्य निर्वाह निधी खातेमधून परतावा / नापरतावा मंजूरी बाबतचे तसेच भविष्य निर्वाह निधी रकमेची अंतिम प्रदाने बाबतचे प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

**मा. आयुक्त तथा संचालक (नपप्रसं) यांच्या मान्यतेने**

30/11/2017

( दगा मोरे )
उप संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय.

प्रत : विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक